**मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीकरीता तयार करण्यात आलेल्या अतिरिक्त माध्यम आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२४/प्र.क्र.१२७/प्रशा-२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ सप्टेंबर, २०२४

**वाचा:-** १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज-२०२१/प्र. क्र. १२३/का-३४, दि. १३.०८.२०२१.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज-२०२३/प्र. क्र. १८७/का-३४, दि. २३.११.२०२३.

३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३, दि. ०९.०७.२०२४

४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मावज-२०२४/प्र. क्र. १४४/मावज, दि. २९.०७.२०२४.

५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र : कौविउ-२०२४/प्र.क्र.१२९/प्रशा-२, दि. ०२.०९.२०२४.

६) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि. १३.०९.२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता संदर्भाधीन दि. ०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये “मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना” कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेचा व्यापक प्रचार व प्रसिद्धी होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्याद्वारे प्रथम मंजूर करण्यात आलेल्या ₹१,९५,२१,१००/- इतक्या रकमेच्या माध्यम आराखड्यास संदर्भाधीन दि. ०२.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीकरीता वित्त विभागाकडून ₹७५.०० कोटी इतका निधी मंजूर झाला आहे. त्यानुसार अतिरिक्त माध्यम आराखडा तयार करण्याबाबत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास कळविण्यात आले होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने प्रस्तुत योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी ₹७३,०३,०१,०००/- इतक्या रकमेचा अतिरिक्त माध्यम आराखडा तयार केला असून सदर आराखड्यास “माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या” दि. १३.०९.२०२४ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने महासंचालनालयाकडून मंजूर करण्यात आलेल्या अतिरिक्त माध्यम आराखड्यास तसेच सदर आराखडा राबविण्याकरीता आवश्यक खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीने मान्यता दिलेल्या अतिरिक्त माध्यम आराखडयास व सदर आराखडा राबविण्याकरीता ₹७३,०३,०१,०००/- (₹ त्र्याहत्तर कोटी तीन लक्ष एक हजार फक्त) (GST सह) इतक्या खर्चास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. मान्यताप्राप्त अतिरिक्त माध्यम आराखड्यास येणाऱ्या अंदाजित खर्चाच्या तपशीलाबाबतचे **परिशिष्ट- अ** सोबत जोडले आहे.

२. माहिती व जनसंपर्क संचालनालयाने संबंधित जाहिरात एजन्सी/आस्थापनांना कार्यादेश देण्याबाबत पुढील कार्यवाही करावी. प्रस्तुत प्रसिद्धी कार्यक्रमाची सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन दि. २९.०७.२०२४ च्या व या विभागाच्या संदर्भाधीन दि. ०२.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेला प्रसिद्धी कार्यक्रम यांत द्विरुक्ती होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

३. उक्त अतिरिक्त माध्यम आराखडा योग्य रितीने अंमलात आणला जाईल, याची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची (DGIPR) ची राहील. जाहिरात खर्चाची देयके मा. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांना सादर करण्यात यावीत. देयकांबाबत कार्यवाही करताना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि. १३.०९.२०२४ च्या बैठकीत दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

४. प्रस्तुत योजनेचा प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/आदेश /परिपत्रके तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये निर्गमित केलेल्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील तरतूदी /अटी व शर्तींचे पालन करावे.

५. प्रस्तुत प्रयोजनासाठी येणारा खर्च लेखाशिर्ष, मागणी क्र. झेडए-०२, २२३०-कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४ संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी, (०१) (०१) सेवायोजन रोजगार उपलब्धताविषयक माहिती व युवक रोजगार विषयक सेवा (२२३० ११०७), २६ जाहिरात व प्रसिद्धी या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९२३१४५४५९२७०३ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRABHAKAR ATMARAM SANKHE

Digitally signed by PRABHAKAR ATMARAM SANKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=1bac9385344f87e77e1084162b6716914d02e353160fac64808fec76c25d6d90, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2F853CAC13002D53D7034663C6F0D48D3ADE65B7222B4D38B6E5902DB13A4750, cn=PRABHAKAR ATMARAM SANKHE
Date: 2024.09.23 14:56:36 +05'30'

**( प्रभाकर संखे )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५) मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१०) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१३) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५) सर्व उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,
१६) सर्व सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
१७) निवडनस्ती- कार्यासन प्रशा-२

शासन निर्णय क्रमांकः कौविउ-२०२४/प्र.क्र.१२७/प्रशा-२, दि. २३.०९.२०२४ सोबतचे

## परिशिष्ट - अ

# मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीने मान्यता दिलेला अतिरिक्त माध्यम आराखडा

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अतिरिक्त माध्यम आराखडा (रक्कम ₹)**

| क्र. | माध्यम | स्वरुप | तपशील | DAVP दर (प्रती नग) | नग | एकूण अंदाजित रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निर्मिती साहित्य (Production of Creative) | **प्रिंट** | प्रिंट आणि इतर बाह्य माध्यमांकरिता जाहिरातीचा मजकूर (Adaptation, Translation, Formating from one media to other media) | १०,००० | १० | १,००,००० | १८,००० | **१,१८,०००** |
| | | **टिव्हीसी** | TVC - ६० Sec. - As per DAVP rate(मराठी, हिंदी, इंग्रजी प्रत्येकी दोन) | ७,००,००० | ६ | ४२,००,००० | ७,५६,००० | **४९,५६,०००** |
| | | **टिव्हीसी with Celebrity** | TVC - ६० Sec. - As per DAVP rate(मराठी, हिंदी, इंग्रजी प्रत्येकी दोन) | २०,००,००० | २ | ४०,००,००० | ७,२०,००० | **४७,२०,०००** |
| | | **जिंगल्स/ स्पॉट** | Audio Jingle (६० Sec.)(मराठी, हिंदी, इंग्रजी प्रत्येकी दोन) | ४५,००० | ४ | १,८०,००० | ३२,४०० | **२,१२,४००** |
| | **Total - A** | | | | | **८४,८०,०००** | **१५,२६,४००** | **१,००,०६,४००** |
| **क्र.** | **Media** | **मूळ दर, प्रक्रिया** | **Details** | **वारंवारिता** | **संख्या/ दिवस** | **एकूण अंदाजित रक्कम** | **जीएसटी** | **एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित)** |
| | **मुद्रित माध्यम (जाहिरात शाखा)** | | | | | | | |
| १ | वृत्तपत्र (News Papers) | शासनमान्य दर | राज्यातील वृत्तपत्रांमधून जाहिरातींद्वारे प्रसिद्धी (राज्यातील मोठा, मध्यम व लघु संवर्गातील निवडक दैनिके) | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | ११,७५,००,००० | ५८,७५,००० | **१२,३३,७५,०००** |
| | **इलेक्ट्रॉनिक दृक-श्राव्ये माध्यम (वृत्तचित्र शाखा)** | | | | | | | |
| १ | मराठी वृत्त वाहिन्याद्वारे टिव्हीसीद्वारे आणि बातमीद्वारे (रिपोतार्ज) योजनेची प्रसिध्दी | CBC (DAVP) यादीवरील व दर | ४५ ते ६० सेकंद जाहिरातींचे (टिव्हीसी) प्रसारण - प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण अथवा रिपोर्ताजद्वारे केल्यास १ ते ३ मिनिटांच्या बातमीपत्राद्वारे प्रसिद्धी अथवा दोन्ही प्रकारे | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | ४,००,००,००० | ७२,००,००० | **४,७२,००,०००** |
| २ | हिंदी इग्रजी वृत्त वाहिन्यांवरुन टिव्हीसीद्वारे आणि बातमीपत्राद्वारे (रिपोर्ताज) योजनेची प्रसिद्धी | CBC (DAVP) यादीवरील व दर | ४५ ते ६० सेकंद जाहिरातींचे (टिव्हीसी) प्रसारण - प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण अथवा रिपोर्ताजद्वारे केल्यास १ ते ३ मिनिटांच्या बातमीपत्राद्वारे प्रसिद्धी अथवा दोन्ही प्रकारे | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | २,००,००,००० | ३६,००,००० | **२,३६,००,०००** |
| ३ | स्थानिक केबलद्वारे प्रसिध्दी | CBC (DAVP) यादीवरील व दर | शासननिर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सूचीमधील संस्थामार्फत विहीत कार्यपध्दतीचे अवलंब करुन प्रसिध्दी करणे | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | १,५०,००,००० | २७,००,००० | **१,७७,००,०००** |
| | **बाह्य माध्यमाद्वारे प्रसिद्धी (प्रदर्शने शाखा)** | | | | | | | |
| १ | खाजगी होर्डिग्ज | CBC (DAVP) यादीवरील व दर | शासन निर्णय दि.२३.११.२३ मधील संस्थांच्या सूचीमधील संस्थामार्फत विहीत कार्यपध्दतीचे अवलंब करुन प्रसिध्दी करणे शक्य होईल. | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | ४,००,००,००० | ७२,००,००० | **४,७२,००,०००** |
| २ | मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकांवरील डिजीटल स्क्रीन | CBC (DAVP) यादीवरील व दर | As per DAVP - एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | १,५७,००,००० | २८,२६,००० | **१,८५,२६,०००** |
| ३ | चर्चगेट (नॉन टिकिटींग झोन) रेल्वे स्थानकांवरील एलईडी / एलसीडी स्क्रीन | CBC (DAVP) यादीवरील व दर | As per DAVP - एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | ५५,००,००० | ९,९०,००० | **६४,९०,०००** |
| | **समाज माध्यमांद्वारे प्रसिद्धी (समाज माध्यम शाखा)** | | | | | | | |
| १ | सोशल मिडीया (Social Media) | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | १५,०५,००,००० | २,७०,९०,००० | **१७,७५,९०,०००** |
| २ | डिजीटल मिडीया, ओटीटी माध्यमांद्वारे प्रसिद्धी | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | १५,१३,००,००० | २,७२,३४,००० | **१७,८५,३४,०००** |
| ३ | व्हॉटस अॅप मेसेजद्वारे/ चॅटबॉट / व्हॉटस अॅप चॅनेलद्वारे प्रसिद्धी (ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.) | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | ५,६५,००,००० | १,०१,७०,००० | **६,६६,७०,०००** |
| | **Total - B** | | | | | **६१,२०,००,०००** | **९,४८,८५,०००** | **७०,६८,८५,०००** |
| | **Total - A + B** | | | | | **६२,०४,८०,०००** | **९,६४,११,४००** | **७१,६८,९१,४००** |
| १ | शा.नि. दि. १३.८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उर्वरित रकमेवर (रु.५ कोटी वजाजाता)) | शासन निर्णय तरतुदीनुसार | माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च, वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च | | | १,३४,०९,६०० | | १,३४,०९,६०० |
| | **TOTAL EXPENDITURE (A + B)** | | | | | **६३,३८,८९,६००** | **९,६४,११,४००** | **७३,०३,०१,०००** |

**************